11 MAR 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळातून स्वतःची ओळख निर्माण करा

## डॉ. देवानंद शिंदे : पुरस्कारप्राप्त खेळाडू, मार्गदर्शक, संघटकांचा सत्कार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : 'प्रामाणिक कष्टाची जोड देऊन, विविध क्रीडा प्रकारातून खेळाडूंनी स्वतःबरोबर विद्यापीठाची ओळख निर्माण करावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. क्रीडा अधिविभागातर्फे विविध पुरस्कारप्राप्त खेळाडू, मार्गदर्शक आणि संघटकांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी जीवन गौरव पुरस्कारप्राप्त बिभिषण पाटील, शिक्षण सल्लागार डॉ. डी. आर. मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. न्यू कॉलेजला क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन गौरविले.



**कोल्हापूर : न्यू कॉलेजच्या खेळाडूंना क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन गौरविताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी अमर सासने, प्राचार्य एन. व्ही. नलवडे, डॉ. पी. टी. गायकवाड, बिभिषण पाटील, डॉ. डी. आर. मोरे आदी.**

डॉ. शिंदे म्हणाले, "यश हे प्रभावी असते. त्यात सातत्य असावे. जसे रंगात वेगवेगळे प्रकार असतात. तसे खेळातही विविध प्रकार असतात. निसर्गाने प्रत्येकाल खेळाची आवड दिली. खेळाची आवड, खेळकर स्वभाव याचे खेळाडू रुपांतर होण्याची प्रक्रिया ही परिवर्तनाची प्रक्रिया म्हणावी लागेल. कष्टाची जोड दिल्याशिवाय यज्ञ सफल होत नाही. मार्गदर्शकांनी केवळ सल्ला देण्यापेक्षा कृती करावी. विद्यापीठाच्या अखत्यारित ३४० महाविद्यालयात ११० शारीरिक शिक्षक आहेत. खेळाडूंच्या सत्कारासाठी मात्र केवळ मोजकेच क्रीडा शिक्षक हजर आहेत. ही परिस्थिती बदलली पाहीजे. क्रीडा प्रकाराला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक सुविधा व मार्गदर्शन खेळाडूंना देण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध आहे. बिभिषण पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रशिक्षक जे. एच. इंगळे यांनी कार्याचा आढावा घेतला. क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. विजय रोकडे यांनी सूत्रसंचालन केले.

**न्यू कॉलेजचा गौरव**

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत विशेष प्रावीण्य मिळवून सर्वात जास्त ६४० गुण संपादन केल्याबद्दल कोल्हापुरातील न्यू कॉलेजला २०१६-१७ च्या खेळातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी देऊन गौरविले.

### आंतरराष्ट्रीय खेळाडूला दोन लाख

**आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकणाऱ्या खेळाडूस शिवाजी विद्यापीठाकडून दोन लाखाचे आर्थिक साहाय्य दिले जाते. येथून पुढे विद्यापीठाकडून खेळणाऱ्या प्रत्येक खेळाडूंचा विमा उतरविण्यात येईल, असे कुलगुरू शिंदे यांनी जाहीर केले. त्याला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.**

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 1 MAR 2018
पुण्यनगरी

# अहिल्यादेवी होळकर यांच्यावर परिसंवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासन, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र आणि छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १२ व १३ मार्च रोजी 'राजमाता अहिल्याबाई होळकर-जीवन व कार्य' या विषयावर दोनदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. चंद्रकांत अभंग उपस्थित राहणार आहेत, तर अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. ए. बी. राजगे भूषविणार आहेत. विनया खडपेकर, संजय सोनवणी, डॉ. यशपाल भिंगेजी, डॉ. तानाजी हवालदार, प्रा. काशीलिंग गावडे, प्रा. महेश घाडगे, डॉ. किशोर खिलारे, श्रीमती निलांबरी गाणू, डॉ. पद्माकर प्रभूणे, डॉ. महेश कार्ला, श्रीमती छाया राजे इत्यादी तज्ज्ञ व्यक्ती अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यासंबंधीच्या पैलूंवर विविध दृष्टिकोनातून मांडणी करणार आहेत. परिसंवादाचे आयोजन शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातील सभागृहामध्ये करण्यात आले आहे. तरी या परिसंवादामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन प्रा. डॉ. एन. डी. पारेकर व डॉ. निलांबरी जगताप यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात उद्यापासून परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासन, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र आणि छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने १२ व १३ मार्च रोजी राजमाता अहिल्याबाई होळकर-जीवन व कार्य या विषयावर दोनदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातील सभागृहामध्ये हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी डॉ. चंद्रकांत अभंग प्रमुख उपस्थित राहणार आहेत. तर अध्यक्षस्थानी प्राचार्य. डॉ. ए. बी. राजगे भूषविणार आहेत.

परिसंवादामध्ये विनया खडपेकर, संजय सोनवणी, डॉ. यशपाल भिंगेजी, डॉ. तानाजी हवालदार, प्रा. काशिलिंग गावडे, प्रा. महेश घाडगे, डॉ. किशोर खिलारे, निलांबरी गानू, डॉ. पद्माकर प्रभुणे, डॉ. महेश कार्ला, श्रीमती छाया राजे सहभागी होणार आहेत. परिसंवादामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन प्रा. डॉ. एन. डी. पारेकर यांनी केले आहे.

1 1 MAR 2018

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून परिसंवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अहिल्यादेवी होळकर अध्यासन, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र आणि छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र यांच्या वतीने सोमवारी (दि. १२) आणि मंगळवारी (दि. १३) रोजी 'राजमाता अहिल्याबाई होळकर-जीवन व कार्य' या विषयावर दोनदिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादाचे उद्घाटन कार्यक्रमास डॉ. चंद्रकांत अभंग प्रमुख पाहुणे असतील तर अध्यक्षस्थानी प्राचार्य. डॉ. ए. बी. राजगे असणार आहेत.

दोन दिवसांच्या परिसंवादामध्ये विनया खडपेकर, संजय सोनवणी, डॉ. यशपाल भिंगेजी, डॉ. पद्माकर प्रभुणे, डॉ. महेश कार्ला, छाया राजे आदी तज्ज्ञ मान्यवर अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यासंबंधीच्या पैलूंवर विविध दृष्टिकोनातून मांडणी करणार आहेत. परिसंवाद इतिहास अधिविभागातील सभागृहामध्ये होणार आहे. परिसंवादामध्ये प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे, असे अवाहन प्रा. डॉ. एन. डी. पारेकर व डॉ. निलांबरी जगताप यांनी केले आहे.